साद आरोग्याची ३

# गर्भाशय काढण्याची शस्त्रक्रिया

## गर्भाशय काढण्याच्या शस्त्रक्रियेबद्दल माहिती:

शस्त्रक्रियेद्वारे गर्भाशय काढून टाकणे याला **हिस्टेरेक्टमी** असे म्हणतात. बोलीभाषेत याला **पिशवी काढणे** असेही म्हणतात. ही शस्त्रक्रिया सामान्यत: स्त्री रोग तज्ञाकडून केली जाते. गर्भाशयाला विशिष्ट आजार झाला तर ही शस्त्रक्रिया करावी लागते. आपल्या समाजात हे आजार होऊनही शस्त्रक्रियेच्या भितीने ती टाळून आजार सहन करण्याची वृत्ती आहे. आणि दुसरीकडे गरज नसतानाही ही शस्त्रक्रिया केली जाते. या दोन्ही गोष्टींवर लक्ष ठेवायला हवे.


स्त्रीच्या ओटीपोटात बेंबीच्या खाली जननेंद्रिये असतात. स्त्रीची चार जननेंद्रिये असतात.

१) ज्याच्यात गर्भ वाढतो, ते गर्भाशय
२) वयात आल्यावर ज्यात स्त्री बीज दर महिन्याला तयार होते व ज्यातून स्त्रीरस स्रवतो अशा दोन बीजग्रंथी
३) स्त्री बीज वाहून नेणाऱ्या दोन बीजवाहिन्या
४) योनीमार्ग.

या जननेंद्रियांना काही आजार झाल्यास गर्भाशय काढण्याची शस्त्रक्रिया करावी लागते.

## गर्भाशय काढण्याच्या शस्त्रक्रियेसंबंधी भारतातील काही अभ्यास:

- हरियाणामध्ये दर हजारी स्त्रियांपैकी ७% स्त्रियांची ही शस्त्रक्रिया झाली. सरासरी ३५ वर्षेवयानंतर गर्भाशय काढल्याची आकडेवारी आहे. तर आंध्रप्रदेशात दर हजारी स्त्रियांमागे ४.६% स्त्रियांचं गर्भाशय काढलं गेलं आहे. (Padma, et el 1996)
- हरियाणा आणि आंध्रप्रदेशात झालेल्या अभ्यासानुसार जास्त (९३%) रुग्ण सर्वात प्रथम दाई, स्थानिक अकुशल आरोग्यसेवक किंवा बुवाकडे जातात असं आढळून आलं आहे. तर त्याच्या खालोखाल खाजगी दवाखान्यात जाणाऱ्यांचं प्रमाण असल्याचं दिसतं.
- काही आरोग्य कर्मचाऱ्यांनी मान्य केलं आहे की गर्भाशयाची शस्त्रक्रिया विनाकारण केली जाते. (Bren 2001)
- आंध्रप्रदेशात झालेल्या अभ्यासानुसार १४.५% स्त्रियांनी निसर्गत: मासिक पाळी बंद होण्याच्या आत शस्त्रक्रिया केल्याचं आढळून आलं आहे, तर शस्त्रक्रियेचं सरासरी वय २४ असल्याचं दिसतं.
- आंध्रप्रदेश राज्यात वारंगळ जिल्ह्यातील एका छोट्याशा खेड्यात लग्नं झालेल्या ३०% स्त्रियांची गर्भाशय काढून टाकण्याची शस्त्रक्रिया केली. (Times of India, August, 2004)
- तथापि ट्रस्टने केलेल्या अभ्यासातून असं दिसून आलं आहे की स्त्रिया शहरात जाऊन खाजगी दवाखान्यातून शस्त्रक्रिया करण्याचं प्रमाण ७५.४०% इतकं मोठं आहे. यासाठी लागणारा खर्च१० हजाराहून अधिक आहे. तसंच ६८.६% स्त्रियांची लग्नं १८ वर्षापूर्वीच झाली आहेत.
- आंध्रप्रदेशात आरोग्य श्री योजने अंतर्गत गुंटूर जिल्ह्यात दोन महिन्यात ११५४ शस्त्रक्रिया झाल्या आहेत. यातील बहुतांशी स्त्रियांची वयं ३५ वर्षाच्या आतील आहेत.



# पुढील कारणांमुळे गर्भाशय काढून टाकावं लागतं -

### १) गर्भाशयात गाठी असल्यास -

सुमारे १५% जननक्षम स्त्रियांमध्ये गर्भाशयात भोवऱ्यासारख्या गाठी असतात. बीजकोशातून स्रवणाऱ्या इस्ट्रोजीन नावाच्या स्त्रीरसावर त्यांची वाढ अवलंबून असते. त्यामुळे पाळी थांबल्यावर इस्ट्रोजीनचे प्रमाण कमी झाल्याने त्या ओसरतात.त्यांचे कर्करोगात रुपांतरही सहसा होत नाही. पण काही स्त्रियांना या गाठींमुळे पाळीच्यावेळी जादा रक्तस्राव, जादा वेदना, गाठींमुळे लघवी/संडासला त्रास असा त्रास झाला किंवा या गाठी फार झपाट्याने वाढू लागल्या तर त्या काढाव्या लागतात. स्त्रीला मूलबाळ नको असेल तर नुसत्या गाठी काढण्यापेक्षा गर्भाशय काढणे श्रेयस्कर ठरते. कारण अनेक गाठी काढणे हे तसे अवघड असते. त्यात रक्तस्राव जास्त होऊ शकतो व शस्त्रक्रियेनंतर नवीन गाठी तयार होऊ शकतात.

### २) गर्भाशय सरकल्यास -

काही दोरासारखे बंध (Ligaments) व ओटीपोटातील स्नायू यामुळे गर्भाशय जागेवर राहते. अयोग्य पद्धतीने केलेली बाळंतपणे, कुपोषण किंवा वयोमान यामुळे तिथे येणारा कमकुवतपणा व बाळंतपणानंतर विश्रांती न मिळाल्याने काहींचे गर्भाशय मायांगाच्या बाजूने खाली सरकते. वेळीच उपाय न मिळाल्यास मायांगातून बाहेर येते. तरूणपणी बाळंतपणानंतर गर्भाशय थोडेसे खाली सरकले असेल तर विशिष्ट व्यायामांमुळे हा दोष शस्त्रक्रियेशिवाय बरा होऊ शकतो.

### ३) जननेंद्रियांना सूज आल्यास -

गर्भाशय, बीजकोष, बीजवाहिनी व सभोवतालचा भाग यांना वारंवार जंतुलागण झाल्यास प्रतिजैविके आणि सूजहारक औषधे देऊनही सूज कधी कधी बरी होत नाही. अशा स्त्रियांना पोटदुखी, संडासला त्रास, समागमाच्या वेळी त्रास, मासिक पाळीच्या तक्रारी इ. त्रास होतो. बरेच दिवस असलेली ही सूज औषधांनी कमी न झाल्यास गर्भाशय काढावे लागते.

### ४) अस्तराची वाढ विपरीत ठिकाणी झाल्यास - (Endometriosis)

काही स्त्रियांमध्ये गर्भाशयाच्या आतील अस्तराच्या काही पेशी गर्भाशयाच्या स्नायूंमध्ये किंवा गर्भाशयाच्या बाहेर वाढतात. मासिक पाळीच्या वेळी या अस्तरातूनही रक्तस्राव होतो. तो बाहेर पडू शकत नाही. त्यामुळे यावेळी पोटात खूप दुखणे, वारंवार रक्तस्राव होऊन सभोवतालचे अवयव गर्भाशयाला चिकटणे इ. त्रास होतो. यावर औषधोपचार घेता येतो किंवा एका छोट्या शस्त्रक्रियेने हे अतिरिक्त पेशींचे पुंजके बाहेर टाकता येतात. यासोबत बीजकोषही काढतात. कारण कितीही काळजीपूर्वक शस्त्रक्रीया केली तरी डोळ्यांना न दिसणारे काही पुंजके शिल्लक राहतात. त्यामुळे बीजकोष काढले तर हा आजार पूर्णत: बरा होण्याची शक्यता वाढते.

### ५) कर्करोग (कॅन्सर) -

गर्भाशयाचा कोणताही भाग व बीजकोष यांना कर्करोग झाला तर गर्भाशय, बीजवाहिन्या व बीजकोष हे सर्व शस्त्रक्रियेने काढावे लागते. भारतात ग्रीवेचा कर्करोग सर्वात जास्त आढळतो. हा कर्करोग अगदी प्राथमिक अवस्थेत असताना निदान होऊन गर्भाशय काढले तर रुग्ण बरी होते.


### ६) पाळीत अति रक्तस्राव होत असल्यास -

मासिक पाळीवर नियंत्रण ठेवणाऱ्या स्त्रीरसांमधील समतोल बिघडला की मासिक पाळीत फार जास्त रक्तस्राव होणे, (रक्ताच्या गाठी पडणे, वारंवार पाळी येऊन अंगावर जादा जाणे, जास्त दिवस जाणे) असा त्रास काहींना होतो. योग्य औषधे घेतल्यास अनेकांच्या बाबतीत हा त्रास आटोक्यात येतो. पण त्यात अपयश आले तर शेवटी गर्भाशय काढावे लागते. अशा रुग्णांपैकी काहींमध्ये गर्भाशयाच्या अस्तरामध्ये कर्करोग-पूर्व बदल झालेले असतात. असे बदल झाल्यास लगेच गर्भाशय काढणे आवश्यक असते.

### ७) बाळंतपणानंतरची गुंतागुंत -

बाळंतपण झाल्यावर गर्भाशय क्वचितप्रसंगी आवळले न जाता त्यातून रक्तस्राव होत राहतो. औषधांनी तो आटोक्यात येतो पण न आल्यास त्या स्त्रीच्या जिवाला धोका पोचतो. अशा वेळेस गर्भाशयाला रक्तपुरवठा करणाऱ्या रक्तवाहिन्या शस्त्रक्रिया करून बांधून रक्तस्राव थांबवला जातो. पण त्यानेही रक्तस्राव आटोक्यात आला नाही तर तातडीची शस्त्रक्रीया करून गर्भाशय काढावे लागते. तसेच बाळंतपणात गर्भाशय फाटले तर ते एकसंध शिवता येण्यासारखे नसले तरी ते तातडीने काढावे लागते. किंवा अशा गर्भाशयात गंभीर जंतुलागण झाली तरी ते काढावे लागते.

# गर्भाशय काढण्याचे प्रकार:




### गर्भाशयाचा काही भाग काढणे

(Partial Hysterectomy) - बीजकोश, बीजवाहिन्या, ग्रीवा, तसेच ठेवून फक्त गर्भाशय काढले जाते.

### पूर्ण गर्भाशय काढणे

(Total Hysterectomy) – बीजकोश, बीजवाहिन्या आणि योनीमार्ग तसाच ठेवून गर्भाशय आणि ग्रीवा काढली जाते.

### मुळापासून गर्भाशय काढणे

(Radical Hysterectomy) – बीजकोश, बीजवाहिन्या, ग्रीवा गर्भाशय, योनीमार्गाचा काही भाग ह सगळे अवयव काढले जातात.

## गर्भाशय काढण्यापूर्वी डॉक्टरांना काय विचारावे?

- ✓ गर्भाशय काढण्याऐवजी त्याला पर्याय म्हणून काही इतर उपचार करता येतील का? शस्त्रक्रिया करणं किती गरजेचं आहे?
- ✓ शस्त्रक्रिया कोणत्या प्रकारे केली जाणार आहे? कोणते अवयव काढले जाणार आहेत?
- ✓ या उपचारानंतर त्याचे शारीरीक, मानसिक, भावनिक परिणाम होतील का? कोणते?
- ✓ शस्त्रक्रीया करण्यापूर्वी काही औषधं, गोळया घ्यावी लागतील का? हॉस्पिटलमध्ये किती काळ रहावं लागेल?
- ✓ माझी मासिक पाळी बंद होण्याचा काळ जवळ आला आहे का?

## मुळापासून गर्भाशय काढून टाकण्याचे धोके आणि परिणाम:

- निसर्गतः मासिक पाळी बंद होण्याच्या पूर्वीच गर्भाशय काढल्यामुळे बीज कोषांना होणाऱ्या रक्तपुरवठ्यात अडथळा निर्माण होत असल्याचं दिसून आलं आहे.
- नैसर्गिकरित्या जेव्हा मासिक पाळी बंद होते तेव्हा संप्रेरकांची पातळी हळूहळू कमी होते. गर्भाशय अखंड शाबूत राहते आणि बीजकोशांमधून मासिक पाळी बंद झाली तरी निसर्गतः संप्रेरकांचा स्राव होत राहतो.
- जेव्हा बीजकोशही काढून टाकले जातात तेव्हा रक्तातील इस्ट्रोजीनची पातळीही खालावते आणि त्यामुळे हृदयाच्या यंत्रणेत आणि हाडांच्या रचनेवर प्रतिकूल परिणाम होतात.
- पूर्ण गर्भाशय काढून टाकल्यास हृदयरोग होण्याची शक्यता तीन टक्क्यांनी वाढते.

तथापि

### शस्त्रक्रियेपूर्वी आवश्यक असलेल्या तपासण्या

१. हिमोग्लोबीन
२. लघवीची तपासणी
३. मधुमेहासाठी तपासणी
४. एच.आय.व्ही.
५. जर वय ४५ पेक्षा जास्त असेल तर ECG व छातीचा फोटो /कार्डिओग्राम
६. इतर त्रास असल्यास (सूज इ.) सोनोग्राफी

### हे खरं आहे -

- गर्भाशय काढून टाकणे हा गर्भाशयाच्या समस्यांवरचा उपाय नव्हे. एकदा गर्भाशय काढल्यानंतर पुन्हा बसवता येत नाही. शिवाय त्यातून होणारी हानी कधीही भरून निघत नाही.
- गर्भाशय काढल्यानंतर तिथे पोकळी राहत नाही, तर कालांतराने हळूहळू इतर अवयव ती जागा घेतात. कारण मुळात गर्भाशय फार मोठे नसते.शिवाय ओटीपोटातील अवयव एकमेकांच्या अतिशय जवळ असतात.

## शस्त्रक्रिया कशी करतात?

साधारणतः तीन प्रकारे ही शस्त्रक्रीया करता येते.

- ओटीपोटावर छेद देऊन तिथून गर्भाशय बाहेर काढतात.
- मायांगाच्या आतल्या बाजूला वर छेद दिल्याने कोणतीही जखम बाहेरून दिसत नाही आणि योनीमार्गाने गर्भाशय बाहेर काढले जाते. या शस्त्रक्रीयेसाठी जास्त कौशल्य लागते.
- तिसऱ्या प्रकारात ओटीपोटावर छेद देऊन त्यात एक छोटी ट्यूब (laparoscope) सोडली जाते. ओटीपोटावर दोन-तीन छेद दिले जातात. त्यातून इतर शस्त्रक्रीयेची साधनं आत जाऊ शकतात. एकदा गर्भाशय कापून विलग केले की योनीमार्गातून ते बाहेर काढणे सोपे जाते.

## गर्भाशय काढल्यावर कोणती लक्षणे जाणवतात?

- ✓ खूप उकडणे / गरम होणे
- ✓ योनीमार्गात कोरडेपणा
- ✓ थकवा येणे किंवा नेहमीची कामे केल्यावरही लवकर थकवा येणे
- ✓ रात्री घाम येणे
- ✓ झोपेच्या तक्रारी
- ✓ अर्धशिशी (डोकेदुखी)
- ✓ चिडचिडेपणा
- ✓ हृदयाचे विकार आणि ठिसूळ हाडे (osteoporosis)
- ✓ लैंगिक भावना कमी होणे
- ✓ हाडे, सांधेदुखी, स्नायूंची दुखी
- ✓ पचनाच्या तक्रारी

## समजून घ्या -

- आपले गर्भाशय काढणे हा दुःखद अनुभव असू शकते. त्यांच्या स्व-प्रतिमेला धोका पोहोचू शकतो. विशेषत: ज्यांना मूल हवं असतं अशा स्त्रियांमध्ये ही भावना आढळते. अशा स्त्रियांना मानसिक आधाराची गरज असते.
- नियमित मासिक पाळी ही नेहमीच्या कामात अडथळा आणणारी आहे असं वाटल्याने गर्भाशय काढणे हा त्रासावरील कायमस्वरूपी उपाय म्हणून बघितला जातो. परंतु, हे शरीरास घातक असते.
- योनिमार्गात जंतुलागण झाल्यास त्वरीत वैद्यकीय उपचार घेणे महत्वाचे आहे.
- अनेकदा आरोग्याच्या सतत तक्रारी नको म्हणून गर्भाशय काढून टाकण्यास कुटुंबाकडून स्त्रीला भाग पाडलं जातं. किंवा तिने गर्भाशय काढून टाकावं अशी परिस्थिती निर्माण केली जाते.

## केगेल व्यायाम -

✓ मूत्रमार्गाच्या व योनिमार्गाच्या स्नायूंना बळकटी येण्यासाठी या व्यायामाची मदत होते. लघवी होताना ती दाबून धरण्यासाठी लघवीची जागा आवळून धरा (मायांग आवळून धरा) ५ आकडे मोजा आणि मायांग सैल सोडा. हळूहळू हे आकडे वाढवत २० पर्यंत मोजा. दिवसातून दहावेळा हा व्यायाम करा. दर वेळी ५ ते १० वेळा स्नायू आवळून धरण्याचा प्रयत्न करा.

✓ दिवसभरात इतर कुठलंही काम करताना हा व्यायाम करता येतो. कोणत्याही उंच वस्तूच्या (कट्टा, ओटा, दिवाण, इ.) टोकावर बसा. दोन गुडघ्यांमध्ये उशी घ्या आणि गुडघे एकमेकांवर शक्य तितक्या घट्ट दाबा. गुडघे दाबताना मोठा श्वास घ्या आणि नंतर हळू हळू सोडा. असं १० वेळा करा. दिवसातून चार वेळा हा व्यायाम करा.

**प्रतिबंधात्मक उपाययोजना - स्त्रियांच्या लैंगिक व प्रजनन आरोग्याच्या दृष्टीने काही उपाय आवश्यक आहेत.**

१. योग्य वयात लग्न करणे (किमान १८ वर्षेपूर्ण झाल्यावर)
२. कमी बाळंतपणं व दोन बाळंतपणामध्ये पुरेसे अंतर
३. जननमार्गाचे जंतुसंसर्ग होऊ नये म्हणून काळजी व उपचार
४. वारंवार गर्भपात न होणे
५. पॅपस्मिअर नियमित करून घेणे
६. वजन योग्य राखणे
७. व्यायाम करणे

## लक्षात ठेवा -

✓ **विनाकारण गर्भाशय काढणे आरोग्यास हानिकारक आहे.**

✓ **शस्त्रक्रीयेसाठी होणारा खर्च, त्याचे फायदे - तोटे, नंतर होणारा त्रास, त्यावरील उपाययोजना हे सर्व समजून घ्या.**

✓ **शस्त्रक्रियेला पर्यायी उपचार आहेत का याबद्दल डॉक्टरांचा सल्ला घ्या.**

✓ **गर्भाशयाच्याशिवाय इतर तक्रारी असतील तर त्याबद्दलही डॉक्टरांशी चर्चा करा.**

✓ **शस्त्रक्रियेनंतर इतर तपासण्यांसह शस्त्रक्रियेचा रिपोर्टही डॉक्टरांनी देणं आवश्यक आहे.**

| समज | शास्त्रीय सत्य |
|---|---|
| फायब्रॉइड गाठींमुळे कर्करोग होतो. | ही समजूत पूर्णपणे चुकीची आहे. फायब्रॉइड सदृश गाठी आहेत,पण प्रत्यक्षात कर्करोग निघतो, ही घटना हजारात एक या सदरात मोडते. काही गाठींचा कसलाच त्रास होत नसल्याने त्या काढण्याची गरज नसते. |

**या विषयांवर अधिक माहिती देणाऱ्या पुस्तकांची यादी**

१. हे मला माहित हवं, लोकविज्ञान प्रकाशन
२. मेनोपॉज, डॉ. आनंद शिंदे. ज्ञाननयन प्रकाशन
३. मेनोपॉज, मासिक पाळी बंद होतानाच्या समस्या आणि उपाय - डॉ. शोभा जोगळेकर, मनोरमा प्रकाशन.
४. दिशा, सामाजिक आरोग्य संशोधन संस्था, पुणे
५. गर्भाशय काढण्याची शस्त्रक्रिया, लोकविज्ञान प्रकाशन
६. लक्ष्मीची गोष्ट (गर्भाशयाच्या कॅन्सरविषयी), सरूची कहाणी (अंगावरून लाल जाणे), राधा मावशीची गोष्ट (अंगावरून पांढरे जाणे), सखुबाईची गोष्ट (अंग बाहेर येणे), फ्लिपबुक - मासूम प्रकाशन, पुणे.

**गर्भाशय काढण्याची शस्त्रक्रिया कुठे केली जाते? तिथे काय सोयी असायला हव्यात?**

◈ जिल्हा रुग्णालयात ही शस्त्रक्रिया केली जाते. साधारणत: चार ते पाच हजार रुपये खर्च येतो. मात्र ससून रुग्णालय पुणे येथे या शस्त्रक्रियेला १५०० रुपयांपर्यंत खर्च येतो.

◈ रुग्णालयापासून पाच किलोमीटरच्या परिसरात रक्तपेढीची सोय असावी.

◈ शस्त्रक्रियेची जागा स्वच्छ असावी, भरपूर प्रकाश व हवा खेळती राहील अशी सोय असावी.

◈ भूल तज्ञ, प्रशिक्षित डॉक्टर असावा. तसेच प्राणवायू देण्याचीही सोय असावी.

साद आरोग्याची या माहितीपत्रकाच्या (Factsheet) मालिकेमध्ये काही निवडक गंभीर आजारांची स्त्रियांच्या दृष्टीकोनातून माहिती दिली जाणार आहे. हृदयरोग, कर्करोग, क्षयरोग यासारख्या गंभीर आजारांचे स्त्रियांवरही परिणाम होतात. स्त्रियांमधील अशा आजारांचं प्रमाण, लक्षणे, उपाययोजना याची थोडक्यात माहिती देणारी माहितीपत्रकांची मालिका तथापि प्रकाशित करत आहे. यात एकूण १२ पत्रकं असतील.

गर्भाशय काढून टाकणे (Hysterectomy) याविषयाची माहिती उपलब्ध असलेल्या आकडेवारीतून दिली आहे. बरेचदा गरज नसतानाही ही शस्त्रक्रिया केली जाते तर दुसरीकडे गरज असूनही भीतीमुळे शस्त्रक्रिया टाळण्याची वृत्ती आढळते. अनेकदा पुरेशा सबळ कारणाशिवायही शस्त्रक्रिया केल्या जातात. शास्त्रीय माहितीचा अभाव, अपुऱ्या सरकारी सेवा, खाजगी डॉक्टरांकडून होणारी आर्थिक पिळवणूक या पार्श्वभूमीवर या शस्त्रक्रियेबद्दल सखोल माहिती असणं जरजेचं आहे. यासाठी हे माहितीपत्रक प्रसिद्ध करत आहोत. या माहितीचा उपयोग नक्की व्हावा. या माहितीच्या आधारे आपण वैयक्तिक पातळीवर बदल करू शकू. तसंच आपल्या गावात/वस्तीत गर्भाशय काढण्याच्या शस्त्रक्रियेसंबंधी जाणीवजागृती करू शकू.

**तथापि ट्रस्ट**
**४२५ डी. पी., ७७ टिमवि कॉलनी, मुकुंद नगर, पुणे ४११०३७**
**दूरध्वनी: ०२० २४२६०२६४/२४२६७९०८**
ईमेल: tathapi@gmail.com, tathapi@tathapi.org
वेबसाइट : www.tathapi.org

**संकल्पना:** ऑड्री फर्नांडिस **लेखन:** दीपा ठाकूर **सहाय्य:** मेधा काळे **डिझाईन:** वेंडी डिक्रूझ
**आभार:** पत्रकावरील सूचनांसाठी डॉ. प्रतिभा कुलकर्णी यांचे आभारी आहोत.

तथापिला सर जे आर डी टाटा ट्रस्ट, मुंबई यांचे अर्थसहाय्य मिळते.